Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed


**Multidisciplinary International Research Journal**

## March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - E

# Women's Rights : Status & Goal





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 24 | कार्यशील महिलाएं एवं मानवाधिकार डॉ.मीना मावी | 93 |
| 25 | कौटुंबिक हिंसाचार व महिलांचे संरक्षण डॉ.लोकेश बी. नंदेश्वर | 96 |
| 26 | संविधानातील महिलाविषयक तरतुदी<br>रुपाली लक्ष्मण राठोड /डॉ .एस.जी.बुटे | 100 |
| 27 | स्त्रियांचे शोषण आणि मानवाधिकार प्रा.डॉ.केशव सिताराम गोरे | 103 |
| 28 | महिला सक्षमीकरण : एक आर्थिक दृष्टीक्षेप **डॉ. सुधाकर सोनोने** | 107 |
| 29 | ग्राम पंचायत प्रशासनातील महीलांचा सहभाग प्रा.नरेश वा. पाटील | 111 |
| 30 | सिमॉन द बूव्हा : स्त्रीवादाची आदय प्रवर्तक प्रा. डॉ. भगवान लोखंडे | 117 |
| 31 | ग्रामीण महिला उद्योजक आणि सक्षमीकरण **प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर** | 125 |
| 32 | लिंगभावाधारीत अर्थसंकल्पात भरीव तरतुद काळाची गरज<br>प्रा. डॉ. विजय के. बन्सोड | 129 |
| 33 | कृषी उदयोगाच्या विकासातील महिलांचे योगदान<br>प्रा.डॉ. सुरेश ल. पंडित | 133 |
| 34 | महिला अधिकार सदयस्थिती आणि ध्येय डॉ.मनीषा द. पवार | 136 |
| 35 | शारीरिक शिक्षणात महिलांचा सहभाग **प्रा. डॉ. तातेराव एकनाथ केंद्रे** | 139 |
| 36 | भारतातील स्त्रीयांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा.अमरिष एस. गावंडे | 143 |
| 37 | कोविड—१९ स्त्रियांच्या मानसिकतेचे अध्ययन<br>प्रा. दिपाली त्र्यंबकराव देशमुख | 147 |
| 38 | भारतातील स्त्रीयांचा राजकीय सहभाग : एक चिकित्सक अध्ययन<br>डॉ.विजय कृष्णराव काळे | 150 |
| 39 | भारतीय संविधान व महिंलाचे मानवाधिकर डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड | 155 |
| 40 | शिक्षणाचा मुलभूत हक्क आणि उच्च शिक्षणातील स्त्रीयांच्या समान संधी समोरील आव्हाने डॉ. सेलूकर एस. एम. | 160 |
| 41 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार<br>कु.स्नेहा सोन्याबापू सोळंके. / अमित नानाभाऊ कुटे | 164 |
| 42 | महिला उद्योजकता विकास काळाची गरज प्रा.डॉ. रीता देशमुख | 167 |
| 43 | स्त्री भ्रूणहत्या — भारतीय समाजाला लागलेला कलंक<br>प्रा.डॉ.मोहन काशीनाथ मिसाळ | 171 |
| 44 | महिलांचे राजकीय सबलीकरण —एक काळाची गरज<br>प्रा.डॉ के. एम गोलेकर | 174 |
| 45 | Laws of Adoption and women's rights **Dr. Margavi S. Dongare** | 178 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276(CCLXXVI) E
ISSN : 2278-9308
March, 2021

# स्त्री भ्रूणहत्या — भारतीय समाजाला लागलेला कलंक

प्रा.डॉ.मोहन काशीनाथ मिसाळ
( इतिहास विभाग ) कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि परभणी

प्रस्तावना,

भारतातच नव्हे तर सर्व जगात कमी अधिक प्रमाणात स्त्रियांना दुयम स्थान दिले जात असल्याचे दिसून येते . स्त्री केवळ पायाची दासी उपभोग्य वस्तू समजून समाजातील सर्वच घटकाकडून तीला अपमानास्पद वागणूक दिली जाते. स्त्रीच्या स्त्रीत्वाचा आदर भारतात झालाच नाही उलट तिचा उपमर्द करणे तिच्यावर दहशत गाजवणे तीचा बळजबरीने उपभोग घेणे इ प्रकार वाढत आहे एकीकडे स्त्रियांची आराधना आणि दुसया बाजूला तिची प्रतारणा असा दुटप्पीपणा भारतीय समाजाचा एक अविभाज्य भाग बनला आहे असा अंर्तविरोध भारतीय समाजात निर्माण झाला आहे आणि म्हणूणच लोकशाही स्विकारल्यानतर सुध्दा भारतीय स्त्रियाना समानता आणि न्याय प्राप्त होउ शकला नाही हे कटु असले तरी सत्य आहे आणि त्याचा परिणाम स्त्रियाना दुयम स्थान समाजात प्राप्त झाले आहे स्त्रियाचे गर्भातच केले जाणारे दमन ही मोठी सामाजिक समस्या उग्र रूप धरत आहे वास्तविक दया हे धर्माचे मूळ आहे ते एक महत्वाचे सांस्कृतीक मुल्य आहे असे सांगणारा समाज स्त्रियाप्रती दयाभावना न दाखवता तिचे असणारे मानवी मूल्यही विसरून गेला आहे त्यामुळेच प्राचीन काळापासून ते आधुनिक युगापर्यत आजही मोठया प्रमाणात स्त्रीभ्रूणहत्या मोठया प्रमाणात होत आहे अलिकडे आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करून स्त्रीभ्रूणहत्या मोठया प्रमाणात करून नैसर्गिक समतोल ढासळवला जात आहे मुलगा हा वंशाचा दिवा त्यामुळे तोच हवा आणि मुलगी नकोच ही भावना व मानसिकता यामागे आहे राज्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार स्त्रियाचे प्रमाण दरहजारी पुरूषामागे ९२० आहे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे

संशोधनाची उदिष्टे

१ राज्यातील स्त्रि—पुरूष समानतेचा अभ्यास करणे
२ स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे
३ स्त्रीभ्रूणहत्या कारणे परिणाम व उपाय सुचविणे

संशोधन पध्दती

सदरील संशोधन लेखासाठी द्वितीय सामुग्रीचा वापर केला आहे समाजात घडणाऱ्या घटनाची माहिती मिळवून त्याचे विश्लेषन केले आहे तसेच विविध नियतकालीके मासिके ग्रंथ संशोधन लेख इंटरनेट इ वापर करण्यात आला आहे

संशोधनाची गृहिते

१ आजही समाजात मुलगाच हवा ही मानसिकता दिसून येते
२ मुलगाच हवा हे पुरूषापेक्षा स्त्रियाना जास्त प्रमाणात वाटत आहे
३ गर्भलिंग चाचणी करणाऱ्यामध्ये शहरी सुशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे

आधुनिक वैद्यकिय तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करून मुलांच्या जन्मासाठी मुलींना गर्भातच मारून टाकण्याची प्रथा मोठया प्रगाणात वाढली आहे सोनोग्राफी हे तंत्रज्ञान वास्तविक गर्भातील बाळाची व्यंग व इतर काही आडचणी तरोच आईची योग्य देखभाल करण्यासाठी आहे पण लोंकानी लिगंनिदान म्हणून त्याचा मोठया प्रमाणात वापर करण्यारा सुरूवात केली त्याचा परिणाम स्त्रीभ्रूणहत्या मोठया प्रमाणात वाढ होउन नैरार्गिक रामतोल ढाराळला आहे. भारतात सोनोग्राफी हे

तंत्रज्ञान १९७५ च्या सुमारास दिल्लीतील ऐम्स रूग्णालयात वरील कारणासाठी वापर करण्यात आला पुढे महाराष्ट्र पंजाब हरियाणा इ राज्यात हे तंत्रज्ञान वापरून मोठया प्रमाणात स्त्रीभ्रूणहत्या करण्यात आल्या आणि याची दखल घेउन टाईम्स ऑफ इंडियाने सामाजिक मानसिकता व सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर यावर सडकून ठिकात्मक लेख प्रसिध्द केला होता अर्थात वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञांचे याला मुकअनुमोदन व पाठींबा असल्याशिवाय हे शक्य नाही पैसा कमावने हा त्यामागे मुख्य हेतू आहे हेच दिसून येते.

मुलींची बालहत्या करण्याची अघोरी प्रथा भारतात १७८९ पासून सुरू आहे राजस्थामधील काही जिल्यामध्ये गूजराथ मधील सुरत कच्छ तसेच उत्तरप्रदेश मधील राजपूत घराण्यात ही प्रथा सर्रास सुरू होती त्यामुळे केवळ आधुनिक तंत्रज्ञानाला नावे ठेवण्यात अर्थ नाही कारण ही प्रथा फारपूर्वीपासूनच चालू आहे आणि स्त्रियांना कमी लेखण्याची मानसिकता यामागे आहे

स्त्रीभ्रूणहत्या विविध कारणे

१ मुलगाच हवा ही मानसिकता — भारतातील प्रत्येक कुटंबातील व्यक्तीला असे वाटते की आपल्या घराण्याचे नाव पुढे चालविण्यासाठी मुलगा हवाच हवा आणि ही मानसिकता केवळ सर्वसामान्याची नाही तर राजे महाराजे यांचीही होती त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या वाढत गेल्या

२ मुला मुलीमध्ये भेदभावजनक वागणूक देणे — आदिम युगानंतर कुटुबांची जवाबदारी म्हणजे पुरूषाचे पौरूषत्व असे समजण्यात येउ लागल्याने त्यामुळे समाजातील स्त्रियाचे महत्व कमी समजण्यात येउ लागले तसेच मुलींना घरातीलच कामे करावी लागत असल्याने त्याना योग्य तो आहार न देणे निकृष्ठ जेवण देणे मुलांचे संगोपन जेवढे काळजीने केले जात तेवढे केले जात नसे तसेच काही कुंटुंबात तर एका मुलीच्या जन्मानंतर दुसरी मुलगी जन्मालाच येउ शकली नाही

३ सामाजिक आर्थिक आणि शारीरीक असुरक्षितता — मानव कुंटुबव्यवस्था मध्ये राहू लागल्याने काही नियम बनविले उदा मुलीचे लग्न लावतांना माहेरहून काही स्त्रिधन द्यावे म्हणजे हुंडा द्यावा त्यामुळे समाजात मोठया प्रमाणात आर्थिक ताण तणाव निर्माण झाला काही समाजामध्ये तर हुडांप्रथा मोठया प्रमाणात दिसून येते त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबाला जगणे अशक्य झाले त्याचा परिणाम मुलगी नकोच म्हणून यातून सुटण्याचा प्रयत्न केला तर काही समाजात मुलगी ही ठेवणीतला दागीना आहे योग्य वेळी तो दुसयाच्या हाती द्यावा त्याआधी त्याचा जीवापाड जतन करावा आणि हे टाळण्यासाठी स्त्रीभ्रूणहत्या वाढण्यात आल्या

४ दारिद्रय बेकारी आणि निरक्षरता — भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे त्यामुळे मुलींना वाढवायचे कसे संगोपन कसे करावे योग्य वेळी लग्नाचा खर्च कसा करावा असे अनेक प्रश्न मुलींच्या पालकाना भेडसावत असतात कारण एकतर बेकार असतात रोजगाराचा अभाव असतो उत्पन्न अल्प असते त्याबरोबर अंधश्रध्दा निरिक्षरता समाजावर अंधश्रध्देचा मोठया प्रमाणात पगडा आहे अतिम संस्कार साठी मुलगाच हवा त्याशिवाय मोक्ष प्राप्ती मिळत नाही अश्या अनेक परंपराचा पगडा समाजावर आहे त्यामुळे मुलीना पूर्णत विराम दिला आहे

स्त्री भ्रूणहत्या परिणाम

१ वाढता समाजिक असमतोल — कारण मुलीची संख्याच कमी झाली तर सामाजिक समतोल ढासळला जातो अनेक समाजामध्ये तर मुली मिळणे कठीण होउन गेले आहे त्याचा परिणाम अनेक मानसिक शारीरीक व्याधी निर्माण होत आहे

२ स्त्रीयांवर वाढते अत्याचार — कारण समाजात मुलींचे प्रमाण कमी झाल्याने समाजातील बलवान गुंड प्रवृत्तीचे लोक महिलांवर अत्याचार बलात्कार करतील वर्तमान स्थितीत भारतात २७ सेंकदाला एक बलात्कार होत आसतो एका पहाणीनुसार आढळून आले आहे

३ बहुपतीत्व पध्दत निर्माण होईल – कारण पूरूषाच्या वाढत्या सख्येला अपेक्षित प्रमाणात स्त्रियांचे प्रमाण नसेल तर बहुपतीत्व पध्दत निर्माण होईल त्याचा परिणाम स्त्रि पुरूष नातेसबंध नष्ट होईल

४ नवनवीन रोगाची उत्पत्ती होईल – बहुपतीत्व पध्दतीमुळे एका स्त्रिचा संबध अनेक पुरूषाशी येतो त्यामुळे एडसपेक्षा भंयकर रोगाची निर्मीती होण्याची भिती निर्माण होते

उपाययोजना

१ स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधक कायदयाची कठारे आणि प्रामाणिकपणे अमंलबजावणी करणे – राज्याचा १९८८ कायदा तसेच केद्रांचा १९९४ कायदा तसेच २००४ चा सुधारीत गर्भलिंग निदान प्रतिबधंक कायदा केला त्यामधे कठोर शिक्षेची तसेच दंडाची तरतुद आहे पण कायदयाची अमंलबजावणी ढिसाळपध्दतीने होत असल्याने अनेक डॉक्टर कायदयाला बगल देउन सर्रास गर्भलिग निदान करून स्त्री भ्रूणहत्येस मदत करत असतात

२ सर्व खाजगी सोनोग्राफी सेंटरर्स जिल्हा सरकारी रूग्णालयासशी जोडावे आणि त्याचे कनेक्शन WNCS जोडावे त्यामुळे गर्भवती महिलाची सोनोग्राफी करतांना सर्व माहिती कळेल तसेच जिल्हा रूग्णालयाकडून ऑडर टू ओके कोड पाठविल्याशिवाय सोनोग्रफी करता येणार नाही यामुळे प्रतिंबध होण्यास मदत होईल

3 महिला बचत गटाच्या मार्फत स्त्री भ्रूणहत्या बाबत कायदे त्याच्या तरतुदी शिक्षा इ बाबत जनसामान्यापर्यत माहिती पोहचवली पाहिजे प्रसार प्रचार प्रबोधन यंत्रणा निर्माण केली पाहिजे त्यामुळे स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध होण्यास मदत होईल

४ मुलगी ही भारत माता आहे ती मशाल आहे तिमीराचा नाश करणारी आहे तिचे संगोपन मुलाप्रमाणेच झाले पाहिजे ती कोणत्याही बाबतीत कमी नाही आशी मानसिकता निर्माण केली पाहिजे

५ समाजातील स्त्रिवर्गाचे सरंक्षण आणि संवर्धन करणे त्यासाठी डॉ बाबासाहेबांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा हुंडा विरोधी कायदा समान वेतन कायदा इ कायदे केले त्याबाबत समाजात जागृरकता निर्माण करणे महत्वाचे आहे कारण हे कायदे जसे पुरूषासाठी आहे तसे स्त्रियासाठी सुध्दा आहे याची जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे

६ महाविद्यालयनी स्त्रिवर्गाच्या विविध समस्या आडचणी व उपाय याबाबत अभ्यासक्रम राबवून समाजात जागृरकता निर्माण करावी त्यामुळे स्त्रीयांच्या भावनिक व सामाजिक विकास घडून येईल अशा प्रकारे विविध स्वरूपाचे उपाय आसून स्त्री भ्रूणहत्या हा विषय नुसता विचार करायचा नसून कृति करण्याचा आहे समाजरचना संतुलित कशी होईल यावर भर देणे महत्वाचे आहे तरच देशात स्त्रिपुरूष समानता निर्माण होईल.

संर्दभ १ आरोग्य शिक्षण डॉ स्वाती गाउगीळ
२ दै प्रहार लेख ३१ जुलै २०११
३ लोकराज्य मासिक एप्रील २०१०
४ स्त्री प्रश्नाची वाटचाल – विद्युत भागवत प्रतिभा प्रकाशन पुणे २००५
५ भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा – सी टी कांबळे क्रिऐटिव्ह पब्लीकेशन नांदेड २०१०